**"मार्च २०१७" या महिन्यात सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालयामधील सेवा उपविभागाने घेतलेल्या महत्त्वाच्या निर्णयांची संक्षिप्त माहिती...**

## (अ) शासन निर्णय / अधिसूचना

- दिनांक ४ मार्च २०१७ च्या शासन परिपत्रकान्वये सेवाविषयक बाबीसंबंधीची प्रकरणे मा.मुख्यमंत्री यांना सादर करणे व सामान्य प्रशासन विभागास दाखवणे आवश्यक असलेल्या प्रकरणाची यादीत काही विषयांचा समावेश करण्यात आली आहे.
- दिनांक ४ मार्च २०१७ च्या शासन निर्णयान्वये २०५२५०८१ हा लेखाशीर्ष सामान्य प्रशासन विभाग (खुद्द) मधील २६-रोख शाखेकडे कार्यान्वित करण्यात आला आहे. तसेच या लेखाशीर्षासाठी नियंत्रक अधिकारी म्हणून उपसचिव (आस्थापना) आणि आहरण व संवितरण अधिकारी म्हणून अवर सचिव (२६-रोख शाखा) यांना घोषित करण्यात आले आहेत.
- दिनांक ३ मार्च २०१७ च्या शासन परिपत्रकान्वये मंत्रालयीन विभागातील लिपिक / लिपिक-टंकलेखक सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा २०१७ ला पुन्हा (Repeater) बसू इच्छित असलेल्या उमेदवारांचे अर्ज दिनांक २९ मार्च २०१७ पर्यंत पाठविण्याबाबत सर्व प्रशासकीय विभागांना सूचना केल्या आहेत.
- दिनांक १ मार्च २०१७ च्या शासन निर्णयान्वये आस्थापना मंडळासमोर सादर करावयाच्या प्रस्तावाबाबत सुधारित निकष, आवश्यक बाबी व करावयाची कार्यवाही याबाबत सर्वंकष सुधारित सूचना देण्यात आल्या आहेत.
- दिनांक १ मार्च २०१७ च्या शासन निर्णयान्वये भारतीय प्रशासन सेवा (संवर्ग) नियम १९५४ मधील नियम-४(२) मधील परंतुकानुसार Appex Scale (Level १७ in the Pay Matrix) या संवर्गात एक पद तात्पुरत्या स्वरुपात दिनांक १ मार्च २०१७ पासून पुढे एक वर्षाच्या कालावधीकरिता निर्माण करण्यास केंद्र शासनाच्या कार्योत्तर मंजुरीच्या अधीन मंजूर करण्यात आले आहे.
- दिनांक ८ मार्च २०१७ च्या शासन निर्णयान्वये प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकारी कार्यालयाच्या २४ अस्थायी पदांना दिनांक १ मार्च २०१७ ते ३० सप्टेंबर २०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.
- दिनांक ८ मार्च २०१७ च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या आकृतीबंधामध्ये समाविष्ट असलेली ५९ व आकृतीबंधात नसलेली ४६ पदे अशा एकूण १०५ अस्थायी पदांना दिनांक १ मार्च २०१७ ते ३० सप्टेंबर २०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.
- दिनांक १७ मार्च २०१७ च्या शासन निर्णयान्वये एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम-२ अंतर्गत तुकडीच्या वित्तीय वर्ष २०१६-१७ मधील महाराष्ट्र व दिल्ली अभ्यास दौरा तसेच पुनर्विलोकन व उजळणी कार्यक्रमाकरता वसंतराव नाईक राज्य कृषि विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था, नागपूर यांना रु.१,९६,२६,०६४/- इतके अनुदान वितरित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.
- दिनांक १४ फेब्रवारी २०१७ च्या शासन निर्णयान्वये सामान्य प्रशासन विभाग (खुद्द) व या विभागांतर्गत अन्य पाच कार्यालयांच्या आस्थापनेवरील २१८ अस्थायी पदांना दिलेल्या मुदतवाढीच्या पदांपैकी, दोन पदनामांत सुधारणा करुन दिनांक १७ मार्च २०१७ रोजी शुद्धीपत्र निर्गमित करण्यात आले आहे.
- दिनांक १४ मार्च २०१७ च्या शासन निर्णयान्वये Indian Administrative Service – Promotion in various grades {Selection Grade / Super Time Scale (Secretary / Principal Secretary)} – Constitution of Screening Committee / Establishment Board-I ची स्थापना करण्यात आली आहे.
- दिनांक २४ मार्च २०१७ च्या शासन निर्णयान्वये बृहन्मुंबईतील शासकीय कार्यालयातील लिपिक-टंकलेखक पदावरील माजी सैनिक उमेदवारांना शासकीय वाणिज्य संस्थेचे विहित वेगाच्या टंकलेखनाचे प्रमाणपत्र त्याच्या शासन सेवेतील नियुक्तीच्या दिनांकापासून ११ महिन्यांच्या आत सादर करणे आवश्यक राहिल या अधीन राहून नियुक्ती देण्यात यावी, अशी तरतूद करण्यात आली आहे.
- दिनांक २४ मार्च २०१७ च्या शासन निर्णयान्वये Indian Administrative Service – Reviewing the records – Constitution of Revised Review Committee ची स्थापना करण्यात आली आहे.
- दिनांक २४ मार्च २०१७ च्या शासन निर्णयान्वये राज्य प्रशिक्षण धोरणांतर्गत मंजूर तरतुदीतून राज्य प्रशिक्षण नियंत्रण व मुल्यमापन यंत्रणा, यशदा, पुणे व ५ विभागीय प्रशासकीय प्रशिक्षण संस्थांना प्रशासकीय प्रशिक्षणाकरिता प्रशिक्षण शुल्काच्या

खर्चापोटी अनुक्रमे रु.४७१.०१ लाख व रु.११३.८१ लाख असे एकूण रु.५८४.८२ लाख इतके सहायक अनुदान म्हणून वितरित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

- दिनांक २१ मार्च २०१७ च्या शासन निर्णयान्वये जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, परदेशपुरा, संगमनेर, जिल्हा-अहमदनमर या संस्थेच्या मुख्य प्रशासकीय कार्यालयाच्या इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावर प्रशिक्षणार्थी यांच्या निवास व्यवस्थेकरिता रु.४९.२४ लाख इतक्या अंदाजपत्रकास तांत्रिक व प्रशासकीय मान्यता मान्यता देण्यात आली आहे.
- दिनांक २१ मार्च २०१७ च्या शासन परिपत्रकान्वये मंत्रालयीन विभाग व महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कार्यालयातील सहायक कक्ष अधिकाऱ्यांच्या कक्ष अधिकारी पदावरील पदोन्नतीसाठी व नामनिर्देशनाने नियुक्त केलेल्या कक्ष अधिकाऱ्यांच्या "विभागीय कक्ष अधिकारी परीक्षा २०१६" चा निकाल जाहिर करण्यात आला आहे.
- केंद्र शासनाच्या कार्मिक व लोक तक्रार व निवृत्तीवेतन मंत्रालय, कार्मिक व प्रशिक्षण विभाग, नवी दिल्ली यांच्या क्रमांक-२५०१४/०५/२०१६-एआयएस-II, दिनांक १७ जानेवारी २०१७ च्या पत्रान्वये महाराष्ट्र राज्यातील सर्व आहरण व संवितरण अधिकारी यांना महाराष्ट्र राज्य संवर्गातील अखिल भारतीय सेवेतील नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना (NPS) लागू असणाऱ्या अधिकाऱ्यांच्या संदर्भात "Extension of scope of Additional Relief on death / disability covered by the New Defined Contribution Pension System (NPS)" माहितीसाठी दिनांक २१ मार्च २०१७ च्या पत्रान्वये उपलब्ध करुन देण्यात आली आहे.
- दिनांक ३० मार्च २०१७ च्या शासन निर्णयान्वये यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, पुणे या संस्थेच्या प्रोजेक्ट मॅनेजमेंट इमारतीच्या बांधकामाकरिता वित्तीय मान्यता देऊन, योजनांतर्गत खर्चासाठी उपलब्ध असलेले उर्वरित रु.२४,१९,११२/- इतके सहायक अनुदान मंजूर करण्यात आले आहे.
- दिनांक ३० मार्च २०१७ च्या शासन निर्णयान्वये यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, पुणे या संस्थेच्या प्रशिक्षण शुल्काच्या योजनेतर खर्चासाठी उपलब्ध असलेले उर्वरित रु.१२० लाख इतके सहायक अनुदान (अंतिम हप्ता) मंजूर करण्यात आले आहे.
- दिनांक ३० मार्च २०१७ च्या शासन निर्णयान्वये मराठवाडा प्रशासकीय व विकास प्रशासन प्रबोधिनी, औरंगाबाद या संस्थेच्या विकास प्रशिक्षणाच्या योजनेतर (वेतनेतर) खर्चासाठी उपलब्ध असलेले उर्वरित रु.३.४५ लाख इतके सहायक अनुदान (अंतिम हप्ता) मंजूर करण्यात आले आहे.
- दिनांक ३० मार्च २०१७ च्या शासन निर्णयान्वये डॉ.पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशासन प्रबोधिनी, अमरावती या संस्थेच्या विकास प्रशिक्षणाच्या योजनेतर (वेतनेतर) खर्चासाठी उपलब्ध असलेले उर्वरित रु.५.१० लाख इतके सहायक अनुदान (अंतिम हप्ता) मंजूर करण्यात आले आहे.
- दिनांक ३० मार्च २०१७ च्या शासन निर्णयान्वये एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रमाकरिता आर्थिक वर्ष २०१६-१७ मधील मार्च अखेर वेतन या बाबीकरिता यशदा, पुणे या संस्थेस उर्वरित रु.१५.९० लाख इतके सहायक अनुदान मंजूर करण्यात आले आहे.
- दिनांक ३० मार्च २०१७ च्या शासन निर्णयान्वये मराठवाडा प्रशासकीय व विकास प्रशासन प्रबोधिनी, औरंगाबाद या संस्थेच्या सांस्कृतिक सभागृहाच्या शेजारी जुने गोडावून याचे ग्रंथालय व पाळणाघर इमारतीमध्ये रुपांतरित करण्याच्या रु.९५.६४ लाख इतक्या खर्चास प्रशासकीय व रु.८४.०० लाख इतक्या रकमेस वित्तीय मान्यता देण्यात आली आहे. या योजनांर्गत खर्चासाठी उपलब्ध असलेले उर्वरित रु.८४.४५ लाख इतके सहायक अनुदान मंजूर करण्यात आले आहे.
- दिनांक २१ मार्च २०१७ च्या शासन परिपत्रकान्वये सन २०१६-१७ या प्रतिवेदन वर्षासाठी गट-अ संवर्गातील निवडक अधिकाऱ्यांचे कार्यमुल्यमापन अहवाल ऑनलाईन पद्धतीने नोंदविण्यासाठी सुधारित वेळापत्रक प्रसिद्ध करण्यात आले आहे.

### (ब) <u>पदोन्नती / निवडसूची / ज्येष्ठतासूची</u>

- दिनांक ९ मार्च २०१७ च्या शासन परिपत्रकान्वये सहायक कक्ष अधिकारी पदावरील पदोन्नतीसाठी अर्हता प्राप्त करणाऱ्या मंत्रालयीन विभागातील लिपिक-टंकलेखक संवर्गातील १२५८ कर्मचाऱ्यांची दिनांक १ जानेवारी २०१६ रोजीची स्थिती दर्शविणारी अंतिम ज्येष्ठतासूची प्रसिद्ध करण्यात आली आहे.
- दिनांक ८ मार्च २०१७ च्या शासन परिपत्रकान्वये श्री.र.र.गढरी या कक्ष अधिकाऱ्याला दिनांक १ जून २००२ हा मानीव दिनांक दिल्यामुळे, दिनांक १८ फेब्रुवारी २०१७ रोजी सन २००१ ते २००६ या कालावधीची कक्ष अधिकाऱ्यांची प्रसिद्ध

करण्यात आलेल्या तात्पुरत्या जेष्ठतासूचीत त्यांच्या नांवाचा संबंधित वर्षाच्या तात्पुरत्या ज्येष्ठतासूचीत समावेश करण्यात आला आहे.

- दिनांक १८ मार्च २०१७ च्या शासन परिपत्रकान्वये मंत्रालयीन विभागातील २३ वरिष्ठ स्वीय सहायकांची दिनांक १ जानेवारी २०१७ ची स्थिती दर्शविणारी अंतिम ज्येष्ठतासूची प्रसिद्ध करण्यात आली आहे.
- दिनांक १८ मार्च २०१७ च्या शासन परिपत्रकान्वये मंत्रालयीन विभागातील ३७ निवडश्रेणी लघुलेखकांची दिनांक १ जानेवारी २०१७ ची स्थिती दर्शविणारी अंतिम ज्येष्ठतासूची प्रसिद्ध करण्यात आली आहे.
- दिनांक १८ मार्च २०१७ च्या शासन परिपत्रकान्वये मंत्रालयीन विभागातील २२१ उच्चश्रेणी लघुलेखकांची दिनांक १ जानेवारी २०१७ ची स्थिती दर्शविणारी अंतिम ज्येष्ठतासूची प्रसिद्ध करण्यात आली आहे.
- दिनांक १८ मार्च २०१७ च्या शासन परिपत्रकान्वये मंत्रालयीन विभागातील १८७ निम्नश्रेणी लघुलेखकांची दिनांक १ जानेवारी २०१७ ची स्थिती दर्शविणारी अंतिम ज्येष्ठतासूची प्रसिद्ध करण्यात आली आहे.
- दिनांक १८ मार्च २०१७ च्या शासन परिपत्रकान्वये मंत्रालयीन विभागातील ३७ लघुटंकलेखकांची दिनांक १ जानेवारी २०१७ ची स्थिती दर्शविणारी अंतिम ज्येष्ठतासूची प्रसिद्ध करण्यात आली आहे.
- दिनांक १६ मार्च २०१७ च्या शासन परिपत्रकान्वये सन २००७ ते २०१० या कालावधीतील ७५४ कक्ष अधिकारी संवर्गातील अधिकाऱ्यांची सुधारित ज्येष्ठतासूची तात्पुरत्या स्वरुपात प्रसिद्ध करण्यात आली आहे.
- "सहायक कक्ष अधिकारी मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा २०१६" मधील शिफारस प्राप्त ४४ उमेदवारांचे दिनांक २४ मार्च २०१७ च्या आदेशान्वये नियतवाटप करण्यात आले.
- दिनांक ३१ मार्च २०१७ च्या शासन परिपत्रकान्वये मंत्रालयीन विभागातील २२३ उपसचिवांची दिनांक १ जानेवारी २०१३ व १ जानेवारी २०१४ ची स्थिती दर्शविणारी अंतिम ज्येष्ठतासूची प्रसिद्ध करण्यात आली आहे.
- दिनांक ३१ मार्च २०१७ च्या शासन परिपत्रकान्वये मंत्रालयीन विभागातील २८७ उपसचिवांची दिनांक १ जानेवारी २०१५ व १ जानेवारी २०१६ ची स्थिती दर्शविणारी तात्पुरती ज्येष्ठतासूची प्रसिद्ध करण्यात आली आहे.
- दिनांक ३१ मार्च २०१७ च्या शासन परिपत्रकान्वये मंत्रालयीन विभागातील २७१ अवर सचिवांची दिनांक १ जानेवारी २०१२ ते १ जानेवारी २०१६ ची स्थिती दर्शविणारी तात्पुरती ज्येष्ठतासूची प्रसिद्ध करण्यात आली आहे.
- दिनांक ३१ मार्च २०१७ च्या शासन परिपत्रकान्वये मंत्रालयीन विभागातील सहायक कक्ष अधिकारी पदावरील पदोन्नतीसाठी अर्हता प्राप्त करणाऱ्या मंत्रालयीन विभागातील २७ लिपिक-टंकलेखक कर्मचाऱ्यांची दिनांक १ जानेवारी २०१७ ची स्थिती दर्शविणारी तात्पुरती अतिरिक्त ज्येष्ठतासूची प्रसिद्ध करण्यात आली आहे.
- दिनांक ३१ मार्च २०१७ च्या शासन परिपत्रकान्वये मंत्रालयीन विभागातील कक्ष अधिकारी पदावर पदोन्नतीसाठी पात्र ६५० सहायकांची दिनांक १ जानेवारी २०१६ ची स्थिती दर्शविणारी अंतिम सामायिक ज्येष्ठतासूची प्रसिद्ध करण्यात आली आहे.
- १६ उपसचिवांना सहसचिव पदावर तदर्थ पदोन्नती देण्यात आली आहे. तर एका उपसचिवाला पदावनत करण्यात आले आहे.

**(क) <u>बदल्या / पदस्थापना</u>**

- २ कक्ष अधिकाऱ्यांना दिनांक ३१ मार्च २०१७ च्या आदेशान्वये राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त, मुंबई या कार्यालयात तात्पुरत्या स्वरुपात ६ महिन्यांकरिता पदस्थापना देण्यात आली आहे.
- भारतीय प्रशासन सेवा, उच्चश्रेणी लघुलेखक या संवर्गातील अनुक्रमे ४, २ अशा एकूण ६ अधिकारी / कर्मचारी यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. एका सहायक कक्ष अधिकाऱ्याचे प्रत्यावर्तन करण्यात आले आहे.
- दोन उपसचिवांना उपसचिव पदाचा मानीव दिनांक मंजूर करण्यात आला आहे.
- अवर सचिव, कक्ष अधिकारी संवर्गातील अनुक्रमे २२९ व २१६ अशा ४४५ अधिकाऱ्यांना पदोन्नतीचे नियमित दिनांक देण्यात आले आहेत.

***********